**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१४ /(१००/१४)/समन्वय कक्ष,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २२ सप्टेंबर, २०१४

**वाचा :**

१) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. एफएलजी १२०७/प्र.क्र.११/०७/३०,दिनांक २३ ऑगस्ट २००७.
२) गृह विभागाचे परिपत्रक क्र. ०३१३/७१४/प्र.क्र.६२/विशा १ अ, दिनांक १४ जून, २०१४.

**शासन परिपत्रक:**

दरवर्षी २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन, १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन व १ मे रोजी महाराष्ट्र दिन समारंभ राज्यभर साजरे करण्यात येतात. हे समारंभ विविध शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी संस्थांमार्फत ध्वजारोहण करुन साजरे करण्यात येतात. राष्ट्रध्वजाविषयी असलेले प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता जनतेमार्फत वैयक्तिकरित्या छोट्या व प्लॅस्टिक राष्ट्रध्वजांचा वापर करण्यात येतो.

राष्ट्रीय सणांच्या दिवशी लहान आकारातील कागदी व प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असते. शालेय विद्यार्थी व लहान मुले यांच्यासह अनेक व्यक्ती राष्ट्रभक्ती व उत्साहापोटी हे राष्ट्रध्वज विकत घेतात. हे ध्वज त्याच दिवशी सायंकाळी किंवा दुस-या दिवशी इतस्तत: टाकले जातात व त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. काही वेळा राष्ट्रीय कार्यक्रमाच्या वेळी तसेच विशेष कला-क्रीडाप्रसंगी वैयक्तिकरित्या वापरण्यात येणारे राष्ट्रध्वज इतस्तत: टाकले जातात. रस्त्यात इतस्तत: विखुरलेले राष्ट्रध्वज जर प्लॅस्टिकचे असतील तर, प्लॅस्टिक वरेच दिवस नष्ट होत नसल्याने, असे ध्वज बरेच दिवस त्या ठिकाणी दिसतात. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या निदेशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास मान्यता नाही. त्यामुळे प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वज निर्मितीस पायबंद घालण्याच्या दृष्टीने त्याचे उत्पादक, विक्रेते तसेच वितरक यांच्यावर संबंधित शासकीय यंत्रणांनी यथाचित कारवाई करावी.

राष्ट्रध्वजाचा आदर करणे हे देशाच्या प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे व त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे व नांवे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५० व राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे. त्यामुळे जनतेच्या बैयक्तिक वापरासाठी छोट्या कागदी ध्वजाचा वापर करण्यात यावा. तथापि, अशा कागदी ध्वजाचा वापर करताना त्याचा योग्य मान राखला जावा. तसेच असे राष्ट्रध्वज रस्त्यावर व अन्य ठिकाणी फेकून देवू नयेत, राष्टध्वज खराब झाल्याचे आढळल्यास ते ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नष्ट

करण्यात यावेत. राष्टध्वजाचा अवमान होऊ नये यासाठी तसेच राष्ट्रध्वजासाठी प्लॅस्टिकचा वापर होणार नाही याकरिता आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांना देण्यात याव्यात.

राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा, तसेच त्याचा अवमान होऊ नये, यास्तव जिल्हाधिकारी यांनी स्थानिक पातळीवर नागरिकांना आवाहन करुन तसेच जिल्हा, तालुका, ग्रामपंचायत पातळी, मं्डळे, महामंडळै, स्थनिक स्वराज्य संस्था, माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालये, आरोग्य संस्था अशा शासकीय व निमशासकीय यंत्रणेमार्फत तसेच स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत व स्थानिक पोलीस यंत्रणेच्या मदतीने राष्ट्रध्वजासाठी प्लॅस्टिकचा वापर होणार नाही आणि अशा प्रकारांना आळा बसेल याची दक्षता घेण्यात यावी.

राष्ट्रध्वजाचा योग्य मान राखण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक असल्याने स्थनिक पातळीवर स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, केबल वाहिन्या व प्रसार माध्यमे यांचे सहकार्य घेण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात याव्यात. राष्ट्रध्वजाच्या उचित वापरासंदर्भात जनजागृती करुन ध्वजसंहितेतील नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निदेश संबंधित शासकीय यंत्रणांना देण्यात यावेत. राष्ट्रध्वजाच्या अवमान प्रकरणामध्ये संबंधितांवर कठोर कारवाई करण्याबाबतच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात याव्यात. तसेच राष्ट्रध्वजाच्या वापराबाबतच्या सर्व अधिनियम/आदेश/सूचनाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०९२२१४५८०४०६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2014.09.22 14:53:05 +05'30'

( र.प्र.आटे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
२. मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
५. अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांचे स्वीय सहायक

६. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहायक
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. संचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१२. संचालक, महाराष्ट्र राज्य, पाठयपुस्तक निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (राज्य मंडळ), पुणे.
१३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, परिक्षा परिषद, पुणे.
**१४.** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ), पुणे.
१५. संचालक, राज्य शैक्षणिक तंत्र तंत्रज्ञान " बालचित्रवाणी " आगरकर मार्ग, पुणे-४११ ००४.
१६. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य, प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, चर्नीरोड, मुंबई-४०० ००४
१७. संचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, (निपा) जिल्हा परिषद मल्टी परपज हायस्कूल परीसर भडकल गेट, औरंगाबाद.
१८. आयुक्त, (क्रिडा व युवक सेवा), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९. महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२०. महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. निवडनस्ती